23

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** अंबड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0645 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/08/2023 18:24

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 11/08/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 11/08/2023

**Time From (वेळेपासून):** 14:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:34 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 19/08/2023 **Time (वेळ):** 18:10 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 033

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/08/2023 18:10 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** अतिरीक्त सत्र न्यायालय अंबड,परीसर अंबड ता अंबड जि जालना

**(c) In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

(24)



**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** गजानन रंभाजी महाजन

**(b) Father's/Husband's Name (वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस कलनी, पैठणरोड, गेवराई,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस कलनी, पैठणरोड, गेवराई,औरंगाबाद ,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):** नॉन गव्हर्मेन्ट ऑर्गनायझेशन कर्मचारी

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9850206267

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.राहुल सांडु भगत | | | 1. 2-9-221 रवि निवास, नारळी बाग,,साईनाथ किराना मागे, औरंगाबाद,अंबड ,जालना, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दिनांक 19/08/2023

मी गजानन रंभाजी महाजन, वय-35 वर्ष, व्यवसाय खाजगी नौकरी, रा.पोलीस कॉलनी, पैठणरोड, गेवराई, औरंगाबाद मो.क्र.9850206267, 9420209855 समक्ष पोलीस स्टेशन अंबड,जि.जालना येथे हजर राहुन फिर्याद देतो की,

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे पोलीस उप अधीक्षक श्रीमती संगीता पाटील यांचे कक्षात समक्ष हजर राहुन दिनांक 09/08/2023 रोजी तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणी वास्तव्यास असुन मे 2009 मध्ये माझे लग्न शोभा गायकवाड यांच्याशी झाले होते. परंतु काही दिवसांनी आमच्यामध्ये वाद होऊ लागल्याने मागील नऊ महिण्यांपासुन आम्ही विभक्त राहत आहोत.

दिनांक 22/07/2023 रोजी माझ्या पत्नी शोभा महाजन यांनी पोलीस स्टेशन अंबड, जि.जालना येथे गुन्हा रजिस्टर नं.0579/2023 कलम 498 (अ), 323,504,506, 34 भा.द.वि.अन्वये तक्रार दिली असुन त्यामध्ये मी, माझे वडील श्री.रंभाजी महाजन, आई सौ.पद्माबाई महाजन, भाऊ रविंद्र महाजन व माझी मावशी रंजना गायकवाड यांचे आरोपी म्हणुन नाव टाकलेली आहेत. आमच्या विरुध्द दाखल केसचा तपास अंबड पोलीस स्टेशनच्या पिएसआय रंजना बागलाने मॅडम यांच्याकडे आहे. दिनांक 24/07/2023 रोजी पिएसआय रंजना बागलाने मॅडम यांनी मला फोन करुन सांगीतले की, तुमच्या बायकोच्या फिर्यादीवरुन तुमच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असुन तुम्ही पोलीस स्टेशनला या असे सांगीतल्याने दिनांक 26/07/2023 रोजी मी, माझे आई, वडील व मावशी असे माझे वकील श्री.राहुल एस. भगत यांचेसह अंबड पोलीस स्टेशनला गेलो व तेथे पिएसआय रंजना बागलाने मॅडम यांना भेटलो तेथे आमचे जबाब व आमच्या बोटांचे ठसे घेतले त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनचे बाहेर आलो त्यानंतर थोडावेळाने आमचे वकली हे पिएसआय बागलाने मॅडम यांचेशी चर्चा करुन आमच्या जवळ आले व त्यांनी आम्हाला सांगीतले की, तुमचे भाऊ रवि महाजन हे आज हजर नसल्यामुळे त्यांची अॅडजेस्टमेंट करण्याकरीता पिएसआय मॅडम पाच हजार रुपये मागत आहेत त्यामुळे आम्ही आमचे वकिल भगत यांच्याकडे पाचहजार रुपये दिले.

त्यानंतर दिनांक 04/08/2023 रोजी माझे वकिल भगत यांनी मला फोन करुन भेटण्यासाठी बोलावल्याने मी त्यांना भेटण्यासाठी गेलो असता त्यावेळी भगत यांनी मला सांगीतले की, तुमची पत्नी तुमच्या विरुध्द दाखल गुन्हयामध्ये तुमच्या विरुध्द पुरवणी जबाब देणार आहे. तरी तो पुरवणी जबाब न घेण्यासाठी व गुन्हयाचे तपासामध्ये सहकार्य करण्यासाठी पिएसआय बंगलाने मॅडम यांनी 50,000/- रुपयांची मागणी केली आहे. तरी तुम्ही पैशांची व्यवस्था करुन ठेवा पिएसआय बागलाने मॅडम यांनी तुमचे आई, वडील, भाऊ , मावशी व तुम्हाला दिनांक 11/08/2023 रोजी पोलीस स्टेशन ला बोलावले आहे. तरी त्यावेळी आपण पिएसआय बागलाने मॅडम यांनी मागणी केल्या प्रमाणे पैसे देऊन तुमच्या बायकोचा पुरवणी जबाब व गुन्हयाचा तपास अॅडजेस्ट करुन घेऊ असे सांगीतले.

तरी मला पिएसआय बागलाने मॅडम व वकिल श्री.भगत यांना लाच देण्याची इच्छा नाही, माझा बंगलाने मॅडम व वकिल भगत यांच्याशी कोणताही पैसे देण्याघेण्याचा व्यवहार नाही व आमची कोणतीही वैर किंवा दुश्मनी नाही. वकिल श्री.भगत यांची फि रुपये 14000/- ही मी त्यांना रोख अदा केलेली आहे.

मला दिनांक 11/08/2023 रोजी पिएसआय बागलाने मॅडम यांनी भेटण्यासाठी बोलावले आहे त्यावेळी पिएसआय मॅडम यांनी माझ्याकडे स्वत: किंवा माझे वकिलां मार्फत लाचेची मागणी करुन स्विकारल्यास त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाही करण्यात यावी ही विनंती. हि तक्रार दिली.

माझ्या तक्रारीचे अनुषंगाने कारवाई करण्याकरीता दिनांक 11/08/2023 रोजी पोलीस उप अधीक्षक श्रीमती पाटील मॅडम व त्यांचे पथक हे दोन शासकीय पंचासह अंबड येथे आले त्यानंतर मी दिलेल्या तक्रारी बाबत

लाचमागणीची पडताळणी करण्या करीता मझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर व पंच देऊन मला पिएसआय बागलाने मॅडम यांची भेट घेण्याकरीता पो.स्टे.अंबड येथे पाठविले, मी व पंच श्री.पंडीत असे पोलीस स्टेशन अंबड येथे गेलो असता तेथे पिएसआय बंगलाने मॅडम हया उपस्थित नसल्यामुळे मी परत येत असतांना अंबड कोर्टाचे बाहेर माझी व माझे वकिल श्री.भगत यांची भेट झाली तेथे भगत यांनी मला सांगितले की, त्यांनी आपल्याला पहीले पंचवीस पंचवीस च सांगीतलं होतं, माझं फोनवर ही बोलनं झालं होतं, तरी त्यान्ही आज चाळीस बोलल्या होत्या त्या, त्यावर मी म्हणालो की, चाळीस त्यावर वकील भगत म्हणाले की, हा...कारण वीस वीस च्या तं खाली नई होणार ते, त्यावर मि म्हणालो की, चाळीस हजाराचं, मी सहा महिण्यापासुन घरी है, मी लोकाकुण व्याजानं... त्यावर वकिल म्हणाले की, त्यान्हला म्हणलं पंचवीस देतो नई म्हणे तुम्हाला अजुन पाच टाकाव लागतील त्याच्यात त्यावर मी म्हणालो की, तिस हाजारच म्हणल्या का मग ते...त्यावर वकील भगत मग, माझी औरंगाबाद भरचे एवढे कॉर्टेक रिलेशन हेत, कोणाला ही सांग त्यान्हला माहित असता समळ्या गोष्टी असे म्हणाले, त्यानंतर थोडावेळ माझी, वकिल भगत व मैत्रीण गायकवाड यांच्यामध्ये थोडावेळ चर्चा झाली त्यानंतर मी वकिल भगत यांना ठिक है, बघतो मी असे म्हणुन मी, पंच व मैत्रीण गायकवाड असे आमचेकडील खाजगी चारचाकी वाहनाने सापळा पथक थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आलो.

सापळा पथक थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आल्यानंतर मी पोउपअधीक्षक पाटील मॅडम व सापळा पथकास वरील हकीकत सांगीतली त्यावर पोउपअधीक्षक पाटील मॅडम यांनी मला व पंच श्री.पंडीत यांना पुन्हा पिएसआय बंगलाने मॅडम यांची भेट घेण्याकरीता अंबड पोलीस स्टेशन येथे पाठवले तेथे माझी व पिएसआय बागलाने मॅडम यांची भेट झाली त्यावेळी मी त्यांना माझ्याकडे तीस हजार रुपये नाहीत, मला भगत साहेब यांनी आपला निरोप दिलेला आहे असे म्हणालो असता पिएसआय बंगलाने मॅडम हया माझा काही संबंध नाही, तुम्ही पोलीस स्टेशन ला कसे काय आले, तसं बोलत जाऊ नका काही पण असे सांगीतल्यामुळे मी व पंच असे सापळा पथक थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आलो.

तेथे मी पोलीस उप अधीक्षक पाटील मॅडम यांना घडलेली सर्व हकिकत सांगीतली त्यावर पोलीस उप अधीक्षक श्रीमती पॅटील मॅडम यांनी आमचे मध्ये झालेले संभाषण ऐकुण खात्री केली.

वरील प्रमाणे घडलेल्या घटने दरम्यान माझी व माझे वकील श्री.भगत यांचे भेटी दरम्यान वकिल भगत यांनी पिएसआय बंगलाने मॅडम त्यांच्या ओळखीच्या असुन त्यांनी माझ्या विरुध्द दाखल गुन्हयामध्ये माझ्या पत्नीचा पुरवणी जबाब न नोंदविण्यासाठी व गुन्हयात सहकार्य करण्यासाठी तीस हजार रुपये मागणी केली आहे असे सांगीतले त्यावर मी त्यांना ठिक आहे बघतो असे सांगुन आलो होतो परंतु माझ्या कडे पुरेसी रक्कम उपलब्ध नसल्यामुळे माझ्या विनंती नुसार दिनांक 12/08/2023 रोजी माझ्याकडे वकिल भगत यांनी मागणी केल्याप्रमाणे पुर्ण रक्कम उपलब्ध झाल्यानंतर सदर रक्कम वकिल भगत यांना देऊन पुढील सापळा कारवाई करण्याचा निर्णय पोउपअधीक्षक पाटील मॅडम यांनी घेतला त्यामुळे आम्ही परत आमचे घरी निघुन गेलो.

त्यानंतर दिनांक 12/08/2023 रोजी माझ्याकडे पैशांची व्यवस्था झाल्यानंतर मी वकिल भगत यांना वेळोवेळी फोन केला असता ते माझा फोन उचलत नाहीत त्यांना काहीतरी संशय आल्याने वकिल भगत हे यानंतर माझ्याकडुन त्यांनी मागणी केल्याप्रमाणे तीस हजार रुपये लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत अशी माझी खात्री झाली आहे.

वरील प्रमाणे करण्यात आलेल्या लाचमागणी पडताळणी दरम्यान व घडलेल्या घटणेमध्ये माझी व पिएसआय बागलाने मॅडम यांच्या प्रत्यक्ष भेटीमध्ये पिएसआय बागलाने मॅडम यांनी माझ्याकडे कोणत्याही प्रकारे पैशांची मागणी केली नाही परंतु माझे बचाव वकिल श्री.राहुल सांडु भगत यांनी पिएसआय बागलाने मॅडम माझ्या परिचयाच्या असुन, त्यांनी तुमच्या विरुध्द दाखल गुन्हयामध्ये तुमच्या पत्नीचा पुरवणी जबाब न नोंदविण्यासाठी व गुन्हयामध्ये सहकार्य करण्यासाठी तीस हजार रुपये लाच मगीतली आहे असे सांगुन लोकसेवक हे माझ्या ओळखीचे आहेत असे सांगुन माझ्यावर प्रभाव टाकुण माझ्याकडे 30,000/- रुपये लाचेची मागणी केल्यामुळे माझी वकील श्री.राहुल सांडु भगत, रा.2-9-221 रवि निवास, नारळी बाग, साईनाथ किराना मागे, औरंगाबाद यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद मी सांगीतल्या प्रमाणे टंकलीखीत केलेली असुन ती मी वाचुन पाहीली बरोबर व खरी आहे.

ही फिर्याद दिली.

(27)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation:
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Chaitanya Vasantao Kadam(Dy. SP (Deputy Superintendent of Police)) / Dysp

(2) Directed (Name of I.O.) (तपासी अधिका-याचे नाव): or (किंवा)

Rank (पद):

No.(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

ठाणे अमलदार
पो.स्टे.

Name (नाव): Chaitanya Vasantao
Rank(पद): Dy. SP (Deputy Super
No.(सं.): Dysp